# शेळीपालनाचे फायदे

प्रा. आशिष सहाणे
सहाय्यक प्राध्यापक

प्रा. प्रणिता सहाणे
सहाय्यक प्राध्यापिका

कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, गुंजाळवाडी पठार, संगमनेर

अलिकडे शेळीपालन व्यवसायास बरेच महत्त्व येत असून तो एक स्वंतत्र व्यवसाय झाला आहे. हा व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढते आहे.त्याचप्रमाणे शेळीच्या मांसाची मागणीही दिवसेंदिवस वाढतच आहे. काही ठराविक जातीच्या शेळ्या दर दिवशी सरासरी दोन ते अडीच लिटर दूध देतात त्यामुळे हा व्यवसाय अधिकच लोकप्रिय होत चालला आहे.

शेळीला भारतात 'गरीबाची गाय' म्हणतात आणि कोरड्या जमिनीवर शेती करणाऱ्यांसाठी हा एक फार महत्वाचा घटक आहे. किरकोळ किंवा चढउतार असलेल्या पृष्ठभागाच्या जमिनी ह्या गाय किंवा इतर प्रकारच्या जनावरांसाठी चांगल्या नसतील, पण शेळी हा उत्तम पर्याय आहे. फार थोडी गुंतवणूक करून शेळी पालन हा लहान शेतकऱ्यांसाठी एक फायदेशीर उद्योग ठरू शकतो.



### शेळीपालनाचे फायदे:

- शेळीपालन हा व्यवसाय अल्प गंतवणूकीने केला जाऊ शकतो.
- शेतकऱ्यास दूध विकत घेणे शक्य नसल्यामुळे शेळीच्या दुधाचा वापर करणारे ग्रामीण भागात लोक मोठ्या प्रमाणावर आढळतात.
- शेळ्या ह्या शेतकऱ्यांसाठी 'बचत बँकेचे' कार्य करतात. आवश्यता पडल्यास त्वरित काही शेळ्या विकून पैसा उभा केला जाऊ शकतात.
- शेळ्या काटक असून विपरीत हवामानशी जुळवून घेण्याची त्यांची क्षमता असते.
- शेळ्या निकृष्ट प्रतीच्या चाऱ्याचे मांसात किंवा दुधात रूपांतर करतात.
- शेळ्याचे दोन पिढीतील अंतर कमी असून लवकर उत्पादन मिळते त्यामुळे शेतकऱ्याला फायदाच होतो.
- त्यांना जागा कमी लागते यामुळे निवाऱ्या करिता खर्च कमी होतो.
- काही जातीच्या शेळ्यापासून लोकर (मोहेर) मिळते.
- शेळ्यांचे खत उत्तम असते.
- आपल्या देशांत गोमांस कुणी खात नाही म्हणून शेळीच्या मांसाला जास्त मागणी आहे.
- शेळ्यांच्या शिंगा पासून व खुरापासून डिंकयुक्त पदार्थ बनवितात.
- शाकाहारी अन्नात कमी असणारे अमिनो आम्ल उदा. लसयसिन, मिथिओनीन व ट्रिप्टोफॅन शेळीच्या मांसात अधिक असते.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ७९७२७५६९०२)

(पान क्रमांक ७ वरून...)

### कडूलिंब:

- लिंबोळी, कडूलिंबाची पाने औषधीत वापरतात. कडूलिंबाचे तेल हे त्वचा विकारांवर अत्यंत गुणकारी आहे.
- कडूलिंबांमध्ये जीवाणू, परोपजीवी जंतू व बुरशी विरोधी गुणधर्म असल्यामुळे जवळपास सर्व प्रकारांतील त्वचा विकारांत कडूलिंबाचा अत्यंत चांगला उपयोग होतो.
- कडूलिंबामुळे बाह्य परोपजीवी उदा. उवा, गोचिड इ. देखील कमी होतात, त्यामुळे त्वचा विकाराचा प्रादुर्भावदेखील कमी होतो.
- कडूलिंबाचे तेल त्वचा विकारांवर बाहेरून लावावे.

(उर्वरित पान क्र. १९ वर...)